# अमेरिकेतली सत्यनारायण पूजा

सत्यनारायणाची पूजा असल्याचे आमंत्रण मला ईमेलने आले. येणार का आणि किती कुटुंबीय येणार असे विचारले होते. ते पाहिल्यावर माझ्या डोळ्यांसमोर "एका अलिशान घरात पूजा झालीय व सुग्रास जेवण आहे" असे चित्र उभे राहिले. व लगेच हो असे उत्तर देऊन मी घरच्या सर्व मंडळींना त्यात सामील केले.

प्रत्यक्ष पूजेचा दिवस उजाडला. केव्हा बोलवलंय असा सोपा प्रश्न धर्मपत्नीने केल्यावर मी परत इंटरनेटवर जाऊन पाहिले. तर दिसले की पूजा एका देवळात होती व संध्याकाळी ६ अशी वेळ दिली होती. मी विचारात पडलो. ठीक आहे, अलिशान घरात नाही तर नाही. जेवण तरी नक्कीच असेल. अमेरिकेत ६ च्या पुढे बोलवले की जेवण मिळणार असेच गृहीत धरतात. म्हणजे इथे catered dinner असणार असा त्याचा अर्थ होता. कार्यक्रमाचे स्वरूप देखल्या देवाला एक नमस्कार ठोकून जेवायला बसायचे अशीच image माझ्या डोक्यात होती. पुढे ताटात काय वाढून ठेवले आहे (!) याचा अंदाज मला अजिबात नव्हता!

नेहमीप्रमाणे आम्ही थोडे उशीरा म्हणजे ६:३० वाजता पोहोचलो. (खरे तर आम्ही खूपच लवकर पोचलो होतो हे मला खूप उशीरा उमजले!) अमेरिकेतले हे देऊळ म्हणजे एक अतिशय सामान्य एकमजली बैठी ऑफीससारखी इमारत होती. बाहेरून देवळाचे कुठलेच चिन्ह किंवा नामोनिशाण नव्हते. आत गेल्यावर उजवीकडे पादत्राणे काढून ठेवायची खोली होती. तिथे चपला, बूट ठेवून आम्ही एका मोठ्या हॉलमधे प्रवेश केला. तिथे एका भिंतीला खेटून प्रत्यक्ष देऊळ म्हणजे स्टेजवर सर्व देवांच्या मूर्त्या होत्या. कृष्ण, विष्णू, हनुमान, गणेश, राम, सीता अशा अनेक देवतांच्या संगमरवरी मूर्त्या छान सजवून मढवून आशीर्वाद देण्याचा आविर्भाव घेऊन ओळीने उभ्या होत्या. स्टेजला लागूनच खाली बसून सत्यनारायणाची पूजा चालू होती. पूजा करणारी family तिथे कोंडाळे करून बसलेली होती. त्यांचे मित्र, नातेवाईक, हितचिंतक इत्यादी लोक त्यांच्या मागे बसले होते. हॉल मोठा असल्यामुळे मोकळी जागा भरपूर होती. त्यामुळे सुदैवाने केव्हाही उठून बाहेर जाणे व परत येऊन बसणे सहज शक्य होते.

जेवणाची कुठेच काही तयारी दिसली नाही! त्यामुळे मी जरा हबकलो. पूजा सांगणारे गुरूजी आता कुठे गरम होत होते. सर्व पूजा लाऊडस्पीकरवर चालू होती. कानठळया बसतील इतका मोठा आवाज होता. पण भक्त लोकांना बहुतेक त्याची सवय असावी कारण त्या कर्कश आवाजाला सर्वचजण सरावलेले वाटत होते. भारतीय लोक मुळातच सोशीक. धर्माच्या नावाखाली होणाऱ्या असल्या अत्याचारांना तर ते ईश्वरी प्रसादच समजत असावेत!

पूजेच्या नावाखाली गुरूजी काहीबाही मंत्र मोठ्या-मोठ्याने बेसूर आवाजात म्हणत होते. त्या मंत्रांकडे कुणाचेच लक्ष नव्हते. खुद्द गुरूजींचेही लक्ष इतर गोष्टींकडे होते. कोण येतेय, कोण जातेय, कोण काय करतेय, इत्यादी. मंत्र गुरूजींच्या मुखातून लाऊडस्पीकरद्वारे अंतराळात विलीन होत होते. ते सत्यनारायण पूजेचे होते की आणखी कसले होते हेही कळायला मार्ग नव्हता. खूप वेळ झाला तरी ते मंत्र काही संपेनात. मी अस्वस्थ झालो. इतका वेळ मांडी घालून बसायचीही सवय आता गेली होती. ओळखीच्या चेहऱ्यांकडे पाहून स्मितहास्य करून किंवा हात हलवून झाले. सगळ्या मूर्त्या न्याहाळून झाल्या. आणखी कुणी बोअर

झालेय का याचा शोध घेतला पण सगळे एका विचित्र resigned स्थितीत दिसत होते. भक्तीरसात रममाण, तल्लीन झाले असेही नव्हते, पण "आलिया भोगासी असावे सादर" असे चेहरे सगळ्यांचे दिसत होते. ईश्वरभक्ती म्हणजे हेच - मांड्यांना रग लागली तरी तासनतास बसून राहाणे, मंत्रांचा भडीमार ऐकून घेणे, वेळेचे भान विसरणे, इ. - अशी स्वीकृती त्यांच्या डोळ्यात होती. बहुतेक सर्व भक्तगण उच्चशिक्षित व Microsoft/Google यासारख्या कंपन्यांत काम करणारे होते. अर्थात शिक्षण आणि धार्मिकता/श्रद्धा किंवा कर्मठपणा यांचा काहीच परस्परसंबंध नाही हे मी पूर्वीच जाणले होते.

सुदैवाने गुरूजींचा मंत्रघोष थांबला. मी सुस्कारा टाकला व जेवणाची काही तयारी दिसते का याचा नजरेने वेध घेतला. पण गुरूजींनी "सत्यनारायणाची कथा" हा प्रकार सुरू केला. माझ्या आठवणीतली ही कथा म्हणजे एक सुरस गोष्ट ऐकण्याचा अनुभव होता. "साधुवाणी, त्याची कन्या, त्याचा जावई" असे त्यातले कलाकार मला आठवले. पण आता सुरू झालेली ही कथा धार्मिक अत्याचाराचा एक अभिनव प्रकार होता. प्रत्येक परिच्छेद गुरूजी आधी हिंदीत व मग नंतर त्यांच्या भयानक इंग्रजीत सांगत होते. आणि प्रत्येक परिच्छेदानंतर ते "जय-जय श्री सत्यनारायण" असा घोष करत काही मिनिटे वाया घालवत होते. त्या कथेमधेही काहीच मनोरंजक नव्हते. असा तो कथावाचनाचा प्रकार इतका लांबला, काही केल्या संपेच ना! मी कमालीचा अस्वस्थ झालो. कुठून दुर्बुद्धी सुचली आणि इथे आलो असे मला सारखे वाटू लागले. आता जेवणदेखील नको पण हा प्रकार आवरा असे म्हणायची पाळी आली होती.

अर्ध्या-पाऊण तासांच्या त्या रटाळ कथाप्रकारानंतर गुरूजी थांबले. मी म्हटले - चला संपली बुवा सत्यनारायणाची पूजा. पण कसले काय. गुरूजी म्हणाले - "आता आपण आरत्या म्हणूया". बाप रे! एव्हाना मी पुढे काय होणार आहे याचा अंदाज घेण्यात खूपच हुशार झालो होतो. आता हे सर्व लोक १५-२० आरत्या म्हटल्याखेरीज थांबणार नाहीत असा मी कयास बांधला. व ताबडतोब त्या हॉलमधून पलायन केले. पलायन केले म्हणजे काय तर देवळाच्या बाहेर म्हणजे त्या बिल्डींगच्या बाहेर जाऊन मी चक्क येरझाऱ्या घालू लागलो. आत आरत्या सुरू झाल्या. संगीतकलेवर इतक्या प्रकारचे अनाचार कुणी केले नसतील. अतिशय बेसूर, बेताल अशा प्रकारे सर्व तऱ्हेच्या पट्ट्यात व कर्कश्श आवाजात सर्व भक्तगण उभे राहून आरत्या केकाटत (स्त्रिया) किंवा रेकत (पुरूष) होते. गुरूजींना खास लाऊडस्पीकरचा मान होता! देवळातल्या मूर्त्यांच्या आत चुकून जरी काही क्षण येण्याचा देवतांनी विचार केला असता तर त्या आरत्या ऐकून त्यांनी नक्की धूम ठोकली असती!

हॉलच्या बाहेर मला माझ्यासारखाच एक इसम येरझाऱ्या घालताना दिसला. समदुःखी व्यक्ती पाहून मला समाधान वाटले व मी एकदा समोरासमोर आल्यावर "Boy! what is that!" अशी सर्वसाधारण कॉमेंट केली. त्याचे पाणी नक्की कुठे मुरते आहे हे माहित नसल्याने मी एव्हढेच बोललो. त्यावर तो म्हणाला - "The speaker is too loud!" म्हणजे या इसमाला तेव्हढेच खुपले होते. बाकी सर्व प्रकार त्याला ईश्वरभक्ती या सदराखाली मान्य होते!

प्रत्येक फेरी मारताना मी खिडकीतून आत डोकावून अंदाज घेत होतो. आरत्यांचा आकडा आता १५-२० च्याही पुढे गेला होता. पण गुरूजींच्या उत्साहाला व भक्तगणांच्या सोशीकतेला अंत नव्हता! फक्त एकच

समाधानाची गोष्ट म्हणजे हॉलच्या दुसऱ्या कोपऱ्यात आता चक्क जेवणाची तयारी सुरू झाली होती. वेगवेगळे ट्रे मांडले जात होते. काही अधाशी भक्तांनी प्रसाद प्राशन करायलाही सुरूवात केली होती. मी लोकलज्जेस्तव "आरत्या संपेपर्यंत थांबूयात" असा विचार करून येरझाऱ्या मारत राहिलो.

अखेर ते भयाण संगीत थांबले व विश्वातल्या सर्व देवतांनी सुटकेचा निःश्वास टाकला. मी आनंदाने पुन्हा हॉलमधे घुसलो. आता तरी गुरूजी सोडतील, तर कसचे काय! त्यांनी दुसऱ्या एका सुपर-गुरूजींना "दोन आशीर्वाद" द्यायला पाचारण केले आणि या नव्या उत्साहाच्या गुरूजींनी भलतेच लेक्चर सुरू केले. सत्यनारायणाचा महिमा, आपण दीन पापी भक्त काय करू शकतो, आपले दैनंदिन आचरण कसे असले पाहिजे, अशा वेगवेगळ्या विषयांवर त्यांनी सुनवायला सुरूवात केली. उपदेशाचा भडिमार एकदा सुरू केला की उपदेश देणाऱ्या माणसाचा उत्साह वाढतच जातो याचे ते जिवंत उदाहरण होते. त्यांचे प्रत्येक वाक्य संपले की मी मनोमन प्रार्थना करायचो की हा आता शेवटचा उपदेश ठरू दे. पण कसले काय!

असा हा प्रकार अजून १५-२० मिनिटे चालला! बऱ्याच भक्तांचा - विशेषतः लेकुरवाळ्या महिलांचा व ज्येष्ठ नागरिकांचा - patience आता संपला होता व त्यांनी जेवणाच्या रांगेत नंबर लावला होता. मीही त्यांचे उदाहरण आदर्श मानून रांगेत उभा राहिलो. सुदैवाने जेवण उत्तम होते. "प्रसाद" या नावाखाली बरेच प्रकार भक्त लोकांनी आणून ठेवले होते. शिऱ्याचेच ६ प्रकार होते! मी तत्परतेने व असीम भक्तीने माझी प्लेट शिगोशीग भरली व एका खुर्चीवर बसून मनःपूर्वक आस्वाद घेण्यास सुरूवात केली! तब्बल ४ तासांच्या तपश्चर्येनंतर हा सत्यनारायणाचा प्रसाद मला अमृततुल्यच वाटला!

---oooo(((())))oooo---

लेखकः अभय बिंदुमाधव जोशी (abjoshi@yahoo.com), *Last updated: 12 September 2018*